**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ मधील निशाण ११२ व ११३ वरील एकत्रात आदेश**

CNR: MHSI05-000253-2018

प्रस्तुतचा अर्ज हा कोर्ट कमिशनर नेमण्यासाठी प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी प्रत्येकी वेगळे अर्ज केलेली असून त्या अर्जातील मजकुर एकसारखाच असल्याने मी सदर अर्ज एकत्रामध्ये विचारात घेत आहे. सदर प्रतिवादी यांनी असे नमूद केले आहे की, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादी यांनी दावा परिशिष्ट 'ब' मधून परिशिष्ट 'अ' मध्ये रस्ता जातो त्यावरती वादी याचा easement ने हक्क आहे अशा ठरावाकरीता व कायम ताकिदीकरीता दावा दाखल केलेला आहे. मात्र सदर मिळतीचा सातबारा परिशिष्ट 'ब' च्या मिळकतीना सर्व प्रतिवादी व अनेक सहभागधार यांच्या नावे आहेत. त्यांचे अद्याप वाटप झालेले नाही. काही सहभागधारांची समजुतीने अनेक वर्षापासून कब्जावहीवाट आहे. अशा परिस्थितीत वादी कथन करतो त्याप्रमाणे दावा परिशिष्ट 'ब' मिळकतीमधून परिशिष्ट 'अ' मिळकतीमध्ये कधीही रस्ता जात नव्हता असे त्यांचे म्हणणे आहे. सबब सदर अस्तित्व नसलेला रस्ता धुर्तपणे व लबाडीने दर्शवून वादी आपला बेकायदेशीर हक्क उभा करु पाहात आहे. तसेच प्रतिवादीच्या खाजगी जागेत आपली ताकद वापरुन, जबरदस्तीने काहीही करुन रस्ता तयार करण्यासाठी पेटून उठला आहे. अशाप्रकारे वादी हा न्यायालयाची देखील फसवणुक करत आहे. यामुळे दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे गरजेचे असल्यामुळे कोर्ट कमीशन नेमावा अशी मागणी प्रतिवादीने केलेली आहे.

२. या दोन्ही अर्जांना वादी याने निशाण १२७ येथे म्हणणे दिलेले असून त्यांचे अवलोकन केले असता, वादी याने कोर्ट कमीशनर नेमण्यासाठी कोणतीही हरकत नसल्याचे वादीने सांगितले. मात्र सदर कोर्ट कमीशनर हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ७ प्रमाणे नियमात येईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्याने पुढे असे नमुद केले आहे की कोर्ट कमीशनचा आदेश होताना वादीने दाव्यात नमुद केलेल्या रस्त्याची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ हिने या न्यायालयाचा तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश रद्द झाल्यानंतर दरमानच्या कालावधीत दावा रस्त्याला लागून आपल्या नव्याने बांधलेल्या घराच्या समोर तीन बाजुने दगडी चिरे लावून रस्ता अडवूण, तसेच दावा रस्ता हा दावा मिळकत परिशिष्ट 'ब' मधून परिशिष्ट 'अ' मिळकतीमध्ये जेथून प्रवेशतो तेथे दोन्ही मिळकतीच्या हद्दीवर बांधकामाचे चिरे

रचून, संपुर्ण दावा रस्ता अडवून जो अडथळा निर्माण केलेला आहे त्याची सखोल माहिती न्यायालयात सादर करावी व वाटेचे व्हिडीओ शुटींग करावे अशी वादीने मागणी केली आहे. या व्यतिरिक्त वादीवर केलेला आरोप त्याने नाकारला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दाव्यामध्ये एखादया वकिलाची कोर्ट कमीशनर म्हणून नेमणूक व्हावी या मताला दोन्ही बाजु तयार आहेत. अशा परिस्थितीत या दाव्याचे अवलोकन केले असता दावा परिशिष्ट 'अ' मिळकतीतून परिशिष्ट 'ब' मिळकतीमध्ये रस्ता जातो किंवा कसे या गोष्टीला अनुसरुन तुर्तातुर्त ताकिद अर्जाचा न्यायनिर्णय करावा लागणार आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीमधून रस्त्याचे अस्तित्व आहे का नाही व त्यावरती अडथळा निर्माण झालेला आहे का नाही हे पहाणे गरजेचे झालेले आहे. सबब तुर्तातुर्त ताकिद अर्जाच्या निर्णयासाठी कोर्ट कमीशनर म्हणून ॲड. पराडकर यांची नेमणुक करणे मला उचित वाटते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

१. दोन्ही अर्ज मंजुर करण्यात येतात.

२. कोर्ट कमिशनर म्हणुन ॲड. के. आर. पराडकर यांची नेमणुक करणेत येत आहे.

३. कोर्ट कमीशनर यांनी दावा मिळकत परिशिष्ट 'अ' व 'ब' येथे प्रत्यक्ष जावून परिशिष्ट 'अ' मिळकतीमधून परिशिष्ट 'ब' मिळकतीकडे दाव्यात नमूद केल्याप्रमाणे रस्ता जातो का याची पहाणी करायची आहे.
त्याकरीता दाव्यासोबत जोडलेल्या नकाशाची मदत घ्यायची आहे.

४. सदर पहाणी करताना कोर्ट कमीशन यांनी जो काही रस्ता दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे दिसून येतो किंवा त्यांना स्वत:ला ज्याप्रमाणे दिसून येतो त्या रस्त्याबाबत एक हाती नकाशा तयार करायचा आहे. दाव्यात नमूद केल्याप्रमाणे असणारा रस्ता किंवा कोर्ट कमिशनर यांना स्वत:हून दिसणा—या वेगळया स्वरुपाचे रस्त्यावरती कोठेही, कसल्याही स्वरुपाचा हरकत अडथळा दिसून आल्यास सदर हरकत अडथळा हातनकाशात नमुद करायचा आहे.

५. तसेच त्याचे छायाचित्र देखील काढायचे आहे. जी काही वाट कोर्ट कमिशनर यांना दिसेल त्याचे चित्रीकरण देखील करुन आपला अहवाल सोबत जोडायचा आहे.

६. कोर्ट कमीशनसाठी येणारा खर्च दोन्ही पक्षकारांनी करायचा आहे. कोर्ट कमीशन पूर्ण झाल्यावर कोर्ट कमिशनर सांगतील तितकी रक्कम कोर्टकमीशन फी म्हणून उभय पक्षकारांनी समानरित्या भरायची आहे.

७. कोर्ट कमीशनसाठी लागणारे कागदपत्र वादीने कोर्ट कमीशन यांना त्याबाबत पुरवावयाचे आहेत.

८. येणेप्रमाणे कोर्ट कमीशन करुन कोर्ट कमीशनर यांनी आपला अहवाल लागलीच या न्यायालयाकडे सादर करायचा आहे.

९. वादी व प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांनी कोर्ट कमीशनर सांगतील त्यावेळेस कोर्टकमीशनसाठी उपस्थित राहून त्यांना सहकार्य करायचे आहे.

सही/—

दिनांक— ०१/०४/२०१९

विनायक द. पाटील
दिवाणी न्यायाधीश क.स्तर वेंगुर्ला.